वाचा - १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७
२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागांकडील शासन निर्णय क्र. अकंपा/२०२५/प्र.क्र.१२१/९३/म.लो.आ. दि.१७/०७/२०२५
३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागांकडील शासन निर्णय क्र.अकंपा/१२२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दि.३१/०७/२०२५
४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागांकडील परिपत्रक क्र. अकंपा/१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ. दि.२२/०८/२०२५
५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागांकडील परिपत्रक क्र. अकंपा/१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ. दि.११/०९/२०२५
६) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागांकडील पत्र क्र.अकंपा/१२२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दि.११/०९/२०२५
७) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०३/टिएनटी-१/दिनांक २०/०१/२०१६
८) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक सिईटी-२०१५/प्र.क्र.१४९/टिएनटी-१/दिनांक ०७/०२/२०१९
९) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्रक्र.३११/टिएनटी-१ दिनांक ०१/०१/२०१९
१०) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२२/प्रक्र.१०६/टिएनटी-१ उिपसंक १०/११/२०२२
११) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्रक्र.१७४/टिएनटी-१ दिनांक २१/०६/२०२३
१२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टिएनटी-१ दिनांक ०७/०२/२०१९, शुध्दीपत्रक दि.२५/०२/२०१९ दि.२५/०२/२०१९ व १२/०६/२०१९
१३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.५०९/टिएनटी-१ दिनांक १३/१०/२०२३
१४) मा.वि.कक्ष नाशिक यांनी पत्र क्र.मावक/कार्या-१८/कावि-२/एसआर/२२६/२०२५ दि.१०/०३/२०२५ अन्वये तपासणी केलेली शिक्षण विभाग(प्राथ.) जि.प.जळगांव यांच्या कडील उप शिक्षक संवर्गाची बिंदुनामावली नोंदवही.
१३) शिक्षणाधिकारी(प्राथ.) यांचे पत्र क्र.शिक्षण/आस्था३ब/आरआर/२७५/२०२५ दि.०१/१२/२०२५ अन्वये प्राप्त उमेदवार शैक्षणिक कागदपत्र पडताळणी अहवाल.
१३) माहे फेब्रुवारी २०२६ मधे प्रसिध्द कलेली गट क ची प्रतिक्षा यादी
१४) अनुकंपा भरती निवड समिती बैठकीचे इतिवृत्त दिनांक १३/०३/२०२६

---

<u>नियुक्ती आदेश</u> जा.क्र.साप्रवि/आस्था-११/आरआर/**९३**/२०२६ सा.प्र.वि.जि.प.जळगांव दिनांक १३/०३/२०२६

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ व उक्त शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मला असलेल्या अधिकाराचा वापर करून मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव खालील नमुद उमेदवारांना अनुकंपा तत्वावर **शिक्षण सेवक (मराठी)** म्हणुन दरमहा रक्कम रु.१६०००/- अक्षरी रक्कम रु.सोळा हजार मात्र ) मानधन तत्वावर वैदयकीय तपासणी, चरित्र पडताळणी व जात वैधता प्रमाणपत्र इ.बाबींच पुर्तता व पडताळणी करण्याच्या अधिन राहुन खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणुक करीत असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्राथमिक शाळेत रिक्त पदी पदस्थापित करीत आहे. सदर नेमणुक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची आहे.

| अ.क्र. | अनुकंपा धारक उमेदवाराचे नांव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापना केलेल्या गावाचे व तालुक्याचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती मीना लालचंद पाटील मु पों आशिर्वाद डीम सिटी पुनगांव रोड पाचोरा | इमाव | इमाव | जि.प.प्राथ.शाळा होळ ता.पाचोरा जि.जळगांव |
| २ | श्रीमती आशा विशाल गवळी मु पो यावल ता यावल हल्ली मु. प्लॉट नं बी १० गंधर्व कॉलनी पातोंडा शिवार नंदुरबार ता.जि.नंदुरबार | भ ज ब | भ ज ब | जि.प.प्राथ.शाळा बोढरे ता.चाळीसगांव जि.जळगांव |
| ३ | श्रीमती ज्योती सुरेद्र सपकाळे वरणगांव ता भुसावल ह.मु.सपकाळे बिल्डींग नंबर एफ-१, रुम नं.५०३ , श्री.सी.जी.गार्डन वालवलीनाका, बारवी डॉमरोड बदलापूर पश्चिम ४२१५०३ ता.अंबरनाथ जि.ठाणे | .अनु जाती | .अनु जाती | जि.प.प्राथ.शाळा मन्यारखेडा ता.भुसावळ जि.जळगांव |

शिक्षण सेवक म्हणून उमेदवारास या आदेशात त्यांच्या नांवासमोर नमुद जळगांव जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत काम करावे लागेल. व सदर उमेदवारांची अपदवीधर शिक्षण सेवक / पदविधर शिक्षण सेवक या पदावर नियुक्ती ही ०३ वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी समाधानकारकरित्या पुर्णकरण्याच्या व खालील विहित अटी व शर्तीच्या अधिन असेल.

१) सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास नोटीसीशिवाय केव्हाही कारण न दाखविता कमी करण्यात येईल अशी असून टीईटी घोटाळयामध्ये नांव समाविष्ठ असल्यास अथवा भविष्यात निदर्शनास आल्यास सेवा समाप्त करणेत येवून फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येईल.

२) सदर पदासाठी खर्च हा शासकीय मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३)सदर उमेदवारांना अनुकंपा तत्वावर देण्यात आलेली नेमणुक नाकारता येणार नाही. सदरची नेमणुक नाकारल्यास अनुकंपा तत्वावरील नेमणुक रद्द करण्यात येईल, त्यानंतर अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्यात येणार नाही.

४) उमेदवारास सदर पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडेस एक महिन्याची आगावू नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचा पगार नोटीसी ऐवजी जिल्हा परिषद, जळगांव चे जिल्हा निधीत त्यांना जमा करावा लागेल.

५) उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून **<u>एक महिन्याच्या</u>** आत कामावर हजर होणे आवश्यक आहे. जर ते सदर मुदतीत हजर झाले नाहीत तर त्यांची नेमणुक रद्द समजण्यात येईल.

६) नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी सदर उमेदवारांनी यापूर्वी नोकरी (खाजगी संस्थेमध्ये किंवा खाजगी ठिकाणी) करीत असलेल्या सर्व पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे.

७) सदर उमेदवारांनी हजर झालेनंतर तीन महिन्याचेआंत माहाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम १७ चे तरतुदीनुसार विहीत नमुन्यातील आवश्यक ते विवरणपत्र संबंधित कार्यालय प्रमुखांचे समक्ष भरून देणे आवश्यक आहे. सदर विवरणपत्र संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात चिकटविण्यात यावे.

८) सदर उमेदवारांची नेमणुक पूर्व चारित्र्य व वर्तणुक बाबत सक्षम प्राधिका-याकडील पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. अशा पडताळणी / चौकशी अंती काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास सदर उमेदवार हे शासन परिपत्रक दि.२७/९/१९६० मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या सेवेतून कमी करण्यात येतील. सदर पडताळणीसाठी आवश्यक असलेले विहीत नमुन्यातील सांक्षांकन नमुना संबंधीत उमेदवार यांनी सदर आदेशाचे दिनांकापासून दहा दिवसाचे आंत गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयास तीन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

९) शासन निर्णय दिनांक १२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत, उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहिल. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव कार्यालय प्रमुख/विभागप्रमुखामार्फत संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्याच्या आंत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर दिलेली नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करुन अनुसुचित जाती, अनु.जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदी नुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल.

याप्रमाणे मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर उमेदवाराची नेमणूक रद्द होवून त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या जावू शकतील. या बाबतचे हमीपत्र १००/- चे प्रतिज्ञापत्रावर हजर होतेवेळी संबधित उमेदवाराने कार्यालयास भरुन दयावयाचे आहे.

१०) सदर उमेदवारांनी नियुक्तीचे कार्यालयास हजर होण्यापूर्वी म.जिल्हा शल्य चिकित्सक जळगांव यांचेकडून वैदयकीय तपासणी करुन घेवून या जिल्हा परिषदेमध्ये सादर पदावर सेवेसाठी शारीरीक दृष्टया पात्र असले बाबतचा वैदयकीय दाखला सादर करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराने या बाबत म.जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडेस सादर करावयाचे पत्र उमेदवाराने त्यांचे पदस्थापित कार्यालयाच्या कार्यालयप्रमुखाकडून प्राप्त करावयाचे आहे.

११) नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

१२) संबंधित कार्यालय प्रमुखांनी या आदेशातील उमेदवारांना हजर करून घेतांना त्यांचेकडून त्यांची जन्मतारीख, जात, जमात, शैक्षणिक अर्हता इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ प्रमाणपत्रके तपासणी करून घेतल्याशिवाय त्यांना हजर करून घेण्यात येवू नेय.

१३) संबंधित उमेदवारांनी हजर होतांना खालील नमुन्यात कार्यालयाकडे '' हमीपत्र '' करून देणे आवश्यक आहे. कार्यालय प्रमुखांनी देखील असे '' हमीपत्र '' उमेदवाराने करून दिल्याशिवाय हजर करून घेवू नये. सदरचे '' हमीपत्र '' संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात चिकटविण्यात यावे.

**'' हमीपत्र ''**

'' माझी जळगांव जिल्हा परिषदेकडे **शिक्षण सेवक** या पदासाठी अनुकंपा तत्वावर नेमणुक झालेली आहे. सदरची नेमणुक पुर्णतः तात्पुरती व अस्थाई स्वरूपाची असून माझी सेवा मला पूर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल. याची मला जाणीव असून त्या तत्वावर मी सदर नेमणुक स्विकारीत आहे. तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१७४/टिएनटी-१ दिनांक २१/०६/२०२३ अन्वये जिल्हा बदलीचा हक्क राहणार नाही याची मला जाणीव असून सदर अटीस मी सहमत व बांधील आहे.''

**समक्ष**

**कार्यालय प्रमुखांची सही व हुद्दा**
**व दिनांक.**

**उमेदवारांची सही व दिनांक.**

१४) विधवा महिला उमेदवार यांचे बाबतीत त्यांनी पुनर्विवाह केला नसल्याबाबत शपथपत्र हजर होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहिल

१५) शासन नियमानुसार दिवंगत शाराकीय कर्मचा-याच्या कुटूंबामध्ये फक्त विवाहित मुलगी हे एकमेव अपल्य असल्यास विवाहित मुलीच्या बाबतीत तिच्या पतीकडूनही दिवंगत शासकीय कर्मचा-याच्या कुटूंबीयांचा तो/ती सांभाळ करील असे प्रतिज्ञापत्र हजर होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहिल. तसेच अनुकंपा तत्वावर एकदा नियुक्ती मिळाल्यावर तो/ती (उमेदवार) कुटूंबीयांचा सांभाळ करीत नसल्याचे आढळल्यास त्याची/तीची शासन सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. या संदर्भात आवश्यक हमीपत्र (Undertaking) हजर होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहिल. तसेच अविवाहित मुलीला अनुकंपा नियुक्ती मिळाल्यानंतर तिचा विवाह झाल्यास विवाहाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आंत तिच्या पतिकडूनही तसे हमीपत्र घेवून कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील.

१६) उमेदवारास महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.१७/०७/२०२५ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहिल. अनुकंपा उमेदवारास मयत कर्मचा-याच्या कुटूंबातील हतर सदस्यांचे पालन पोषण/सांभाळ करणेबाबत शपथपत्र हजर होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहिल.

१७) वरील उमेदवारांच्या बाबतीत त्यांनी दिलेली माहीती अथवा कागदपत्रे हे चुकीचे अथवा अपूर्ण असल्याचे आढळून आल्यास संबंधीत उमेदवारांची सदर नेमणूक रद्द करुन त्यांची सेवा संपुष्टात आणली जाईल.

१८) वरील उमेदवारांनी वेळोवेळी निर्धारीत शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व वेळोवेळी निश्चित करुन देण्यात येणाऱ्या परिक्षा, प्रशिक्षण विहित मुदतीतच उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

१९) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणुक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही. तथापी आपली नियुक्ती रद्द करण्याविरुध्द आपणांस प्राधिकृत समितीकडे अपिल करता येईल

२०) नियमित स्वरुपात नियुक्ती केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकिय कर्मचा-यांच्या सेवा सुविधा विषयक लाभ आपणांस देय असणार नाही.

२१) शिक्षण सेवक पदावर ३ (तीन) वर्ष समाधानकारक काम केल्यानंतर आपणास प्राथमिक शिक्षकांच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यास पात्र समजण्यात येईल. आपण शिक्षण सेवक म्हणून केलेली सेवा वेळोवळी शासनातर्फे लागु करण्यात येणा-या शासन नियमानुसार सेवानिवृत्ती व सेवानिवृत्ती नंतरचे देय फायदे यासाठी ग्राहय धरली जाईल.

२२) आपण प्रशिक्षीत (डी.एड.किंवा समकक्ष) असल्याने शिक्षण सेवक म्हणून दरमहा रु १६०००/- (रु सोळा हजार मात्र ) मानधन दिले जाईल.

२३) नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील

अ) संबधीत गावातील शाळेत जाण्यायोग्य सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करन घेण्याच्या तसेच विद्यार्थ्याच्या शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे

ब) शाळेमध्ये संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे

क) अभ्यासक्रमामध्ये नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती शैक्षणिक साहित्य निर्माण करणे

ड) नेमून दिलेल्या वर्गाची / वर्गाचे विहीत कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे

इ) शासनाने/ विभागाने वेळोवेळी आवश्यक केलेल्या प्रशिक्षणांस उपस्थित राहणे .

ई) शाळेचे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या नियंत्राखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्यांच्या आदेशांचे पालन करणे.

फ) वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपुर्ण व सर्वकष मुल्यमापन करणे

ग) शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या आयोजनामध्ये सहभागी होणे

ट) आपली नियुक्ती उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र. ३६८१/२००० मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहील.

२४) नियुक्ती दिलेल्या ठिकाणी आपल्याला रहावे लागेल. आपण मुख्यालयी न राहिल्यास आपण प्रशासकिय कार्यवाहीस पात्र राहाल.

२५) आवश्यक मुळ कागदपत्र सादर केल्यावर आपणांस जिल्हा परिषद सेवेत हजर करुन घेण्यात येईल

२६) शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४ दि.३१/१०/२००५ नुसार उमेदवारांना '' परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना'' लागु राहील. सदर उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) चे अंशराशीकरण नियम १९८४ नुसार असलेली निवृत्तीवेतन योजना आणि पूर्वीच्या कर्मचा-यासाठी असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही.

२७) गटशिक्षणाधिकारी यांनी संबंधीत उमेदवारांचे महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे या कार्यालयाकडून डि.एड चे गुणपत्रक व प्रमाणपत्र तसेच टी.ई.टी प्रमाणपत्र यांची पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्र वैध असलेनंतरच उमेदवारची नियुक्ती पुढे चालु राहील अन्यथा उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल.

२८) उपरोक्त प्रमाणे नियुक्ती देण्यांत आलेल्या उमेदवारांनी सेवाप्रवेश नियमानुसार 1) प्रादेशिक भाषा परीक्षा (मराठी व हिंदी भाषा) संगणक परीक्षा तसेच इंग्रजी माध्यमातुन व्यावसायिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांना शिक्षण सेवक पदी नियुक्ती नंतर शिक्षण सेवक कालावधी मध्ये कौशल्य चाचणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद म.राज्य पुणे यांच्या अधिनस्त संस्थेकडुन घेण्यांत येणारी चाचणी विहित मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. २) शिक्षण सेवक यांना सेवत हजर झाल्यापासुन २ वर्षाच्या आंत त्यांनी संगणक अर्हता परिक्षा तसेच इंग्रजी माध्यमातुन व्यावसायिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांना शिक्षण सेवक पदी नियुक्ती नंतर शिक्षण सेवक कालावधी मध्ये कौशल्य चाचणी राज्य शैक्षणिक संघोधन व प्रशिक्षण परिषद म.राज्य पुणे यांच्या अधिनस्त संस्थेकडुन घेण्यांत येणारी चाचणी विहित मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

२९) नियुक्तीनंतर वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय व नियम उमेदवारावर बंधकारक राहतील.

३०) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक १३/१०/२०१६ नुसार इ.६ ते ८ च्या वर्गावरील पदवीधर शिक्षकांना देय वेतनश्रेणी बाबत नमुद शासन निर्णय बंधनकारक राहील.

सदर आदेशाची नोंद संबधीतांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात येवुन सदर आदेशाची शासन नियमानुसार तांतडीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.सदर आदेशानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तांतडीने इकडे सादर करण्यात यावा

Minal

मिनल करनवाल (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव

प्रत:- १) संबंधीतास रजिष्टर पोष्टाने

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अर्थ विभाग, जि.प.जळगांव.यांना माहितीसाठी

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग जि.प.जळगांव. यांना माहितीसाठी

४) गट विकास अधिकारी पंचायत समिती ——— यांना माहितीसाठी

५) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती ——— यांना आवश्यकत्या कार्यवाहीसाठी

६) मुख्याध्यापक, जि.प.प्राथमिक शाळा ——— ता. ——— यांनाआवश्यकत्या कार्यवाहीसाठी

Minal

मिनल करनवाल (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव